# ऋणनिर्देश

सोलापूर महानगरपालिकेचा इतिहास अभ्यासण्याची सुवर्णसंधी मला लाभली आहे. ही संधी उपलब्ध करुन देण्यात मला अनेकांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करुन उत्तेजन दिलेले आहे. या सर्वांचा मी ऋणी आहे.

सोलापूर महानगरपालिकेचा इतिहास लिहिण्याची प्रेरणा माझे गुरुवर्य व मार्गदर्शक डॉ.ए.एम.सुतार यांनी दिली. डॉ.ए.एम.सुतार यांनी याकामी आस्थेने व सातत्याने मला मार्गदर्शन केले आहे. त्यांनी माझ्यासाठी घेतलेले परिश्रम आणि त्यांचा लाभलेले मार्गदर्शन न विसरता येण्यासारखे आहे. म्हणून मी त्यांचा मन:पूर्वक ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाचे विभागप्रमुख डॉ.एम.ए.लोहार व डॉ.अ.रा.भोसले, डॉ.एम.पी.पाटील, डॉ.सौ.पी.ए.पाटील, डॉ.सौ.पारेकर, प्रा.अवनिश पाटील, व इतर कर्मचारी वर्ग यांच्याकडून मला प्रोत्साहन मिळाले. या बद्दल मी त्यांचा आभारी आहे. सदरचे लेखन करण्यासाठी प्रा. सोपान जावळे, प्रा.मनोज कसबे, डॉ.चंद्रकांत चव्हाण, प्रा.चौगुले, प्रा.कोळेकर, प्रा.एम.एम.बंदारे, प्रा.एस.एस.तिकुटे यांनी मला सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझ्या शोधप्रबंधासाठी लागणाऱ्या साधनांची उपलब्धता करुन देणारे भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, सोलापूर विद्यापीठ ग्रंथालय सोलापूर, हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर, दयानंद कॉलेज ग्रंथालय सोलापूर, शिवाजी नाईट कॉलेज ग्रंथालय सोलापूर येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पूर्ण आभारी आहे. संशोधन करण्यासाठी मूळ साधनांची उपलब्धत: करुन देणारे सोलापूर महानगरपालिका पुराभिलेखागार, स्टोअर रुम मधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मी आभारी आहे.

संशोधनातील अडचणी दूर करणारे सोलापूर महानगरपालिकेतील सहा. आयुक्त- श्री अनिल विपत, नगरसचिव श्री.बिराजदार पी.वाय., सामान्यप्रशासन विभागातील श्रीमती कुंभार, कामगार कल्याण विभागातील अधिकारी श्री.व्हटकर,

श्री.गायकवाड, श्री.महिंद्रकर, व या विभागातील कर्मचारी, महापौर सौ.अरुणा वाकसे, स्थायी समिती अध्यक्ष रफीकभाई हत्तुरे, नगरसेवक श्री.पुंजाल, माजी नगरसेवक विश्वनाथ बेंद्रे, माजी महापौर बंडप्पा मुन्नाळे, यांचाही पूर्ण आभारी आहे.

तसेच हा शोध प्रबंध श्री. लक्ष्मीकांत ल. अन्नलदास यांनी वेळेत टंकलिखित करुन दिला याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

**ठिकाण :-** **नदाफ हाजीमलंग दावलसाहेब**

**दिनांक :-** २०/१२/२००८ **(संशोधक विद्यार्थी)**